REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# स्वामी विवेकानंदाच्या विचारातील आत्मभान



प्रा.डॉ. संजय कुलकर्णी,
जवाहर महाविद्यालय, अणदूर,
ता. तुळजापूर.

स्वातंत्र्याला ६९ वर्षे झालेली असली तरी भारत देश हा अजूनही राजकीय गोंधळ, आर्थिक विषमता, सामाजिक अराजक आणि वैचारीक संभ्रम यातून बाहेर पडताना दिसत नाही. भारताची लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असल्याचा आपण दावा करीत असलो तरी ती प्रत्यक्षात एकाधिकारशाहीच असल्याचे अनेक वेळा जाणविते. आपण आर्थिकदृष्टया प्रगती होत आहे असे म्हणत असलो तरी गरीब आणि श्रीमंत यातील दरी वाढत चाललेली आहे. विविध जातीच्या गटातटात समाजाचे विघटन होत आहे. आपल्या देशाच्या विद्यापीठातून अनेक बुद्धिवंत बाहेर पडत आहेत, पण सुशिक्षित तरुण आपला देश, आपली संस्कृती, आपला इतिहास आणि त्याचे जगाच्या इतिहासातील कार्य याबाबत संभ्रमित असून दिशाहीन झाले आहेत. संस्कृती, लोकसंख्या, विविधतापूर्ण नैसर्गिक संपदा अशा अनेक गोष्टींने आपण मंडीत झालेले असूनही एक समर्थ देश म्हणून आपण जगातल्या घटनात आपली अशी एक भूमिका वठवू शकत नाही.

व्यक्तिगत व सामाजिक जीवनातही नैतिक मूल्याचा वेगाने ऱ्हास होत आहे. ज्या देशाची मुळे अध्यात्मिक मूल्यात रूजलेली आहेत अशा देशात असे अध:पतन होते व मूल्यांचा अभाव जाणवतो. आपल्या स्वातंत्र्य लढ्यात प्रकट झालेली इच्छाशक्ती व विचारातील स्पष्टता याची जोपर्यंत खरी जाणीव होत नाही तोपर्यंत राष्ट्रीय आत्मविश्वास आणि आपल्या ध्येयाची वैभवशाली जाणीव निर्माण होत नाही. ज्यांचे जीवन आणि विचार आपल्या देशातील स्वातंत्र्य सैनिकांना प्रेरणादायी ठरले त्या स्वामी विवेकानंदाचे मर्मग्राही आणि आत्मभान देणारे विचार आजही आपणास उत्तेजन देत आहेत. देशातील मोठ्या नेत्यांनी स्वामीजीची देशाप्रति असलेली बांधिलकी आणि समर्पण यची प्रशंसा केलेली आहे. त्यांनी नि:संदिग्धपणे स्वामीजींचा त्या प्रेरणेची पावती दिलेली आहे. महात्मा गांधी यांची आदरांजली तर संक्षिप्त पण बोलकी आहे ते म्हणतात, 'मी स्वामीजीच्या विचारांचे अवलोकन केले तेव्हा माझी देशभक्ती हजारपटीनी वाढली'. महात्मा गांधी यांच्यासारख्या श्रेष्ठ नेत्याने अशा प्रभावी शब्दात केलेल्या या प्रशंसेसारखी आणखी कोणती आदारांजली असू शकेल? चक्रवर्ती राजगोपालचारी हे तीक्ष्ण बुद्धीचे नेते होते. त्यांनी स्वामीजीचे कार्य व विचार याचे वर्णन अतिशय समर्पक शब्दात केले आहे. ते म्हणतात, 'स्वामी विवकानंदानी हिंदू धर्म आणि देश वाचविला. आपण त्यामुळे स्वामीजीचे देणे लागतो. ही श्रद्धा आणि स्वामीजीचे धैर्य हेच आपल्याला त्यांनी दिलेला हा वारसा जपायची प्रेरणा देणारे आहे.'

स्वातंत्र्यप्राप्तीच्या ६० वर्षे आधी स्वामीजींनी आपल्या एका भाषणात बोलताना, 'आगामी ५० वर्षे आपल्याला सगळ्या देवांचा विसर पडला तरी चालेल पण केवळ 'भारतमाता' हा एकच देव आपल्या चितंनात असला पाहिजे' असे म्हटले होते. आपल्या मातृभूमीत स्वामीजी विराट ईश्वर दर्शन पाहत होते. एका वाक्यात सांगावयाचे झाले तर स्वामी विवेकानंद यांची प्रिय मातृभूमीची कल्पना आपल्याला कळलीच नाही. त्यामुळे देशाच्या भवितव्याविषयीच्या आशावादाची जागा निराशेने घेतली. ६५ वर्षाच्या काळात नवी पिढी उदयाला आली. भारत देशात नवा विचार आणि नव्या कल्पनांचे वादळ आले. त्यातील अनेक कल्पना परदेशातून आल्या. विवेकानंदासारख्या मंत्रद्रष्ट्या महात्माचे विचार या नव्या कल्पनापुढे दुय्यम ठरविण्यात आले. वास्तविक स्वामीजींचे विचार आधुनिक भारताच्या उभारणीसाठी निरपवाद आणि मार्गदर्शक ठरणारे आहेत. परंतु त्यांचीही बेदखल करण्यात आली. त्यामुळे समाजात स्वार्थ, भष्ट्राचार, सत्तेचे राजकारण, जातीय संघर्ष याचे थैमान सुरु झाले. आपल्या देशातील सरकारने स्वामी विवेकानंदाची जयंती देशभर 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून पाळण्याची घोषणा केली. या कृतीतून स्वामींजी विषयी आदर व्यक्त केला परंतु स्वामीजींचे आदर्श आणि त्यांच्या कल्पना याविषयी समाजाचा स्तरावर म्हणाव्या तेवढ्या गांभीर्याने जागरण झाले नाही.

स्वामी विवेकानंद कट्टर राष्ट्रवादी होते. ते आपल्या देशाविषयी आणि त्यांच्या महानतेविषयी अतिशय भावपूर्णतने बोलत असत. एवढेच नव्हे तर जगाचे चित्र बदलण्याच्या बाबतीत भारताची भूमिका काय असू शकते, याबाबतही मार्गदर्शन केलेले आहे. स्वामीजींनी



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

आजच्या काळात निर्माण झालेचा सर्व प्रश्नांची सुयोग्य, तर्काधिष्ठीत आणि कलासुसंगत अशी उत्तरे देऊन ठेवली आहेत. जागतिकीकरणामुळे राष्ट्रवाद काळबाह्य ठरण्याची काही गरज नाही. तर राष्ट्रवाद आहे म्हणूनच जागतिकिकरण आहे असे त्यांनी म्हटले आहे. देश वेगवेगळे नसते तर त्यातून जगही निर्माण झाले नसते. जागतिक विचारही निर्माण झाला नसता. राष्ट्रवादाची कल्पना ही मानवी उत्क्रांतीच्या अवस्थेतील महत्त्वाची अवस्था आहे. ती कल्पना कधीही कालबाह्य ठरणारी नाही. साऱ्या देशांची एक संघटना निर्माण करण्याच्या ध्येयाकडे वाटचालीसाठी आवश्यक असलेली मानसिक प्रक्रिया राष्ट्रवादामुळे निर्माण होऊ शकते हे स्वामी विवेकानंदानी फार पूर्वी सांगून ठेवलेले आहे. भारतीय राष्ट्रवादाची संकल्पना तर राष्ट्रवादापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. पाश्चात देशाची ती कल्पना नकारात्मक आहे. पण भारताची राष्ट्रवादाची कल्पना सकारात्मक व भावनात्मक आहे.

मानवी जात आणि तिचा इतिहासाचा वरवरचा विचार करणारे विचारवंत जागतिकीकरण ही मानवी एकात्मतेची शवेटची पायरी असल्याचे मानत आहेत. पण स्वामीजींनी याबाबत म्हणून ठेवणे आहे की, कोणतीही विचारपद्धती अद्वैताच्या आधारावर उभी राहत नाही तोपर्यंत ती टिकू शकत नाही. मग ती कितीका उदात्त असेना समाजवाद आणि साम्यवाद यांचे उद्दिष्ट समताआणि सामाजिक न्याय असे होते, पण शेवटी ते ही विचार टिकू शकत नाहीत. राजेशाही, लोकशाही, समाजसत्ताशाही, भांडवलशाही यापैकी कोणलाही राष्ट्रवाद संपवता येणार नाही. मानवी एकात्मता आणि सांस्कृतिक विविधता या राष्ट्रवादाच्या साह्याने साकार होतील. या सगळ्यात भारताची भूमिका काय? याबाबत विवेकानंदानी म्हटले आहे, 'भारताचा आत्मा त्यांच्या अध्यात्मिकतेत आहे. अध्यात्मिक विचारांच्या साह्याने स्वतःचा विकास घडविणे आणि वैदिक आदर्शाच्या आधार मानवतेला मदत करणे हेच भारताचे जागतिक कार्य आहे. अध्यात्मिकता म्हणजे केवळ कर्मकांड नव्हे ती एक जीवनपद्धती आहे. भौतिक प्रगती आणि अध्यात्मिक जागृतीच्या द्वारेच भारत पुढे जाऊ शकतो. त्यांच्या दृष्टीने भारत हा प्रगत, सामाजिक सदभाव जागवणारा, तंत्रज्ञान समृद्ध असा राष्टयित्त्वाच्या भक्कम पायावर उभा राहिलेला पण साऱ्या विश्वाशी सलोखा ठेवणारा देश होणार होता. स्वामीजींनी सर्व धर्म आणि त्यांचे धर्मग्रंथ यांना मान्यता दिली होती. पण त्यांनी माणसाला या सर्व धर्माच्या भेदापलीकडे जाऊन एका अध्यात्मिक चेतनेत जागे व्हावेच लागणार आहे असे आग्रही प्रतिपादन केले होते. आपल्याला अशा एका विश्वात जावे लागणार आहे. जिथे वेद नसतील, बायबल नसेल आणि कुराणही नसेल, पण त्यासाठी वेद, बायबल आणि कुराण यांच्या सौहार्द निर्माण करावे लागेल. स्वामीजींच्या मते भारताची भूमिका दुहेरी होती. भौतिक प्रगती केलेल्या देशांना अध्यात्मिकता शिकविणे आणि भारताला पाश्चात्य देशाकडून तंत्रज्ञान, सामाजिक संघटना बांधण्याची कला हे शिकून घेऊन स्वतःचा समतोल आर्थिक विकास घडवावा लागेल. भारतीयांनी पाश्चात देशात गुरु म्हणून जावे, भिकेचा कटोरा पसरुन काही मागण्यासाठी जाऊ नये. असे झाले तर जगात आपला मान वाढेल असे त्यांचे मत होते. स्वामीजी स्वतःच असे एका गुरुचे ज्वलंत उदाहरण होते. त्यासाठी आपण आपल्या जीवनपद्धतीविषयी दृढ राहिले पाहिजे. आपण इतराकडून काही शिकू शकतो. स्वत्व न सोडताही आपल्याला तसे करता येते. शिकागो येथे भाषणात स्वामीजींनी भारताच्या वैशिष्ट्येपूर्ण शिकवणुकीची जगाला का गरज आहे हेच आवर्जून सांगितले होते. जगात असे काही धडे आहेत की जे केवळ भारतच जगाला शिकवू शकतो, असा विश्वास स्वामीजीच्या ठिकाणी होता.

स्वामी विवेकानंदाच्या विचारातील जाणिवेचा, आत्मभावाचा विचार करता आपणास त्यांनी अनेक विषयात स्पर्श केलेला आहे. त्यांनी स्त्री जीवन विषयक विचारही परखडपणे मांडले आहेत. स्त्रीला ते विश्वधात्री देवता मानीत. पुरुषला वेसन घालून सन्मार्गावर आणण्याचे अफाट सामर्थ्य स्त्रीमध्ये आहे अशी त्यांची मनोमन श्रद्धा होती. एकदा एका शिष्याने स्वामींना प्रश्न केला, भारतीय स्त्रीयांना कोणत्या प्रकारचे शिक्षण देणे इष्ट असे आपणास वाटते, या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात त्यांनी दाखविलेली स्त्रीशिक्षणाची दिशा आजही मार्गदर्शक ठरेल. स्वामीजींच्या मते, धर्म, कला, शास्त्र, गृहव्यवसाय, पाककला, शिवणकला व आरोग्यशास्त्र या विषयांचा समावेश अभ्यासक्रमात झाला पाहिजे. प्रत्येक स्त्रीवर समाजाला वळण लावण्याचे महत्त्वाचे कार्य निर्सगानेच सोपविले आहे अशी त्यांची धारणा होती. ते एका आदर्शवादी दृष्टीकोनातून स्त्री जीवनाचा विचार करीत होते.

स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्याचा विचार करताना त्यांची जीवनाबद्दलची, देशाबद्दलची एक आदर्शवादी दृष्टीकोन होता. नैतिकता, आध्यात्मक सचोटी, ध्यास आणि प्रेम याद्वारे आपला देश जगाला चांगला मार्गदर्शन करु शकतो असा विश्वास स्वामीजीना होता. तो त्यांच्या विचारातून आणि साहित्यातून आपणास जाणवितो.

संदर्भ -

१. विश्वमानव - स्वामी विवेकानंद (प्रथम खंड), डॉ. वि. रा. करंदीकर
२. स्वामी विवेकानंदांच्या सहवासात - शदरचंद्र चक्रवर्ती
३. पुरवणी - दैनिक दिव्यमराठी, जानेवारी २०१३
४. पुरवणी - दैनिक लोकमत, जानेवारी २०११



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.